सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण
# जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे

टोल फ्री क्रमांक 1077 दुरध्वनी क्रमांक 020-26123371 E-Mail homebranchpune@gmail.com

---

**वाचा :-** 1) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005
2) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम 1897
3) महाराष्ट्र पोलीस अधिनियम 1951
4) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, यांचेकडील पत्र क्र. कोरोना- 2020/प्र.क्र.385/ आरोग्य-5 दिनांक 11/09/2020

---

जिल्हाधिकारी पुणे

क्र.जि.आ.व्य/कावि/२६३६/2020
पुणे दिनांक ११ / 09 / 2020

**विषय :-** राज्यातील सर्व कोवीड-19 रुग्णालये आणि कोवीड-19 हेल्थ सेंटर मधील ऑक्सीजन पुरवठा सुरळीत ठेवणेकरीता जिल्हास्तरीय समिती गठीत करणेबाबत.

**आदेश,**

ज्याअर्थी, आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 मधील कलम 25 अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे. व त्यातील पोट कलम 2(अ) नुसार जिल्हाधिकारी हे उक्त प्राधिकरणाचे पदसिद्ध अध्यक्ष आहेत.

राज्य शासनाने कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा 1897 दिनांक 13/03/2020 पासून लागू करुन खंड 2, 3 व 4 मधील तरतुदीची अंमलबजावणीसाठी अधिसूचना निर्गमित केलेली आहे. त्याबाबतची नियमावली महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, यांचेकडील शासन निर्णय क्र. कोरोना-2020/प्र.क्र.58/आरोग्य-5 दि. 13/03/2020 दि. 14/03/2020 व दि. 15/03/2020 अन्वये प्रसिध्द केली आहे. आणि जिल्हाधिकारी यांना सक्षम प्राधिकारी घोषित केलेले आहे.

ज्याअर्थी, राज्यात तसेच पुणे जिल्हयात मागील काही दिवसांपासून कोवीड-19 रुग्णांना पुरेसा ऑक्सीजन उपलध होत नसल्याच्या तक्रारी प्राप्त होत आहेत. राज्यात पुरेसे ऑक्सीजनचे उत्पादन होऊनसुध्दा वितरण योग्य प्रकारे होत नसल्यामुळे काही ठिकाणी तात्पुरता तुटवडा होत असल्याची शक्यता आहे. भविष्यात कोवीड-19 रुग्णसंख्येत वाढ होईल आणि ऑक्सीजनची गरज वाढेल ही बाब लक्षात घेता ऑक्सीजन पुरवठा सुरळीत होण्याचे दृष्टीने वाचा क्र. 4 अन्वये सुचना निर्गमित करणेत आलेल्या आहेत. तसेच जिल्हाधिकारी यांनी जिल्हास्तरावर समिती गठीत करणेबाबत सुचित केले आहे.

त्याअर्थी पुणे जिल्हयात कोरोना विषाणू ( COVID १९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी रुग्णालयांना ऑक्सजीन पुरवठा अखंडित पणे सुरु राहण्याकरीता ऑक्सीजन पुरवठा संनियंत्रणासाठी जिल्हास्तरावर खालील अधिकाऱ्यांची जिल्हास्तरीय समिती गठीत करणेत येत आहे.

## जिल्हास्तरीय ऑक्सीजन पुरवठा संनियंत्रण समिती

| अ.क्र. | पदनाम | नियुक्त अधिकारी यांनी पार पाडवयाची जबाबदारी |
|---|---|---|
| 1. | निवासी उपजिल्हाधिकारी, पुणे | सर्व जिल्हाधिकारी कार्यालयाशी समन्वय साधून नियोजन करणे |
| 2. | सहाय्यक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन विभाग, पुणे | उत्पादकांशी समन्वय व बॉटलिंग प्लॅटमधून वाटपाचे नियोजन करणे |
| 3. | महाव्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र, पुणे | उत्पादनांत वाढ व उत्पादकांशी समन्वय साधणे |
| 4. | प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे व पिंपरी चिंचवड | वाहतूक—टँकर समन्वय राहणेबाबतचे नियोजन करणे |
| 5. | जिल्हा शल्य चिकीत्सक, पुणे | जिल्हयातील कोवीड-19 रुग्णांना औषधोपचार करणाऱ्या सर्व सार्वजनिक आरोग्य विभाग, वैद्यकीय शिक्षण विभाग, महानगरपालिका, आणि खाजगी रुग्णालयांना प्रतिदिन लागणाऱ्या ऑक्सीजनची माहिती रुग्णालयानुसार संकलीत करावी. आणि निवासी उपजिल्हाधिकारी, पुणे यांना द्यावी. |
| 6. | जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद पुणे | जिल्हयातील कोवीड-19 रुग्णांना औषधोपचार करणाऱ्या सर्व सार्वजनिक आरोग्य विभाग, वैद्यकीय शिक्षण विभाग, महानगरपालिका, आणि खाजगी रुग्णालयांना प्रतिदिन लागणाऱ्या ऑक्सीजनची मागणी नोंदविणे. |

**जिल्हास्तरीय समितीची कार्ये:-**

1. समितीने दैनंदिन ऑक्सीजनची गरज व ती पुरविणाऱ्या Botting Plants, Bulk Suppliers यांचे सतत संपर्कात राहून प्रत्येक रुग्णालयात वेळेत ऑक्सीजन प्राप्त होईल याची दक्षता घ्यावी.
2. जिल्हास्तरावर आपत्ती व्यवस्थापना अंतर्गत पावसाळयासाठी स्थापन करण्यात आलेल्या कंट्रोल रुमला ऑक्सीजन पुरवठयाची जबाबदारी देणेत येत आहे. आणि कंट्रोल रुम दिनांक 31/12/2020 पर्यंत सुरु ठेवण्यात येत आहे. कंट्रोल रुमचा वापर Oxygen Supply संबंधित अडचणी सोडवणूक करण्यासाठी करावा. पुणे जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कंट्रोल रुम दुरध्वनी क्र. 020-26123371 वर संपर्क साधावा. या कंट्रोल रुमला काही अडचण असल्यास त्यांनी FDA कंट्रोल रुम दुरध्वनी क्र. 022-26592364 व टोल फ्री क्र. 1800 222 365 व संपर्क साधावा.
3. उपरोक्त नुसार समितीने कार्यवाही करुन कोणत्याही रुग्णालयात ऑक्सीजन पुरवठा खंडीत होणार नाही याची दक्षता घ्यावी.

जिल्हाधिकारी पुणे

( डॉ. राजेश देशमुख)
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,**
**जिल्हाधिकारी कार्यालय पुणे**

प्रति, 1) सर्व संबंधित यांना पुढील योग्य तया कार्यवाहीसाठी अपेक्षित.

प्रत -
1. मा. प्रधान सचिव सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय मुंबई 400 001
2. मा.विभागीय आयुक्त पुणे, विभाग पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर.
3. मा. आयुक्त पुणे / पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना माहितीस्तव
4. मा. पोलीस आयुक्त पुणे / पिंपरी चिंचवड व पोलीस अधिक्ष पुणे ग्रामीण यांना माहितीस्तव
5. सह आयुक्त, अन्न व औषध प्रशासन विभाग पुणे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी
6. सह संचालक उद्योग विभाग पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी
7. संचालक / उपसंचालक आरोग्य सेवा संचलनालय (सर्व मंडळे) पुणे
8. सर्व ऑक्सीजन सिलेंडर उत्पादक आस्थापना व ऑक्सीजन सिलेंडर रिफीलिंग आस्थापना पुढील योग्य त्या कार्यवाही